## प्रेस नोट

### रायगड जिल्हा निवड समिती, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

रायगड जिल्हा निवड समिती, रायगड-अलिबाग अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेकडील ग्राम सेवक तसेच कनिष्ठ सहाय्यक या पदांची भरती करणेसाठी रायगड जिल्हा निवड समिती तर्फे दिनांक २३/१०/२०११ रोजी कंत्राटी ग्राम सेवकांची व दिनांक ६/११/२०११ रोजी कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदांच्या लेखी परिक्षा घेण्यांत आल्या. सदरच्या लेखी परिक्षेचा निकाल रायगड जिल्हा निवड समितीतर्फे दिनांक १४/१२/२०११ रोजी सकाळी १०.०० वाजता जाहिर करण्यांत येईल.

ग्राम सेवक पदाच्या लेखी परिक्षेत मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांच्या तोंडी मुलाखती दिनांक १७/१२/२०११ ते १९/१२/२०११ या कालावधीत घेण्यांत येतील. मुलाखतीचा सविस्तर कार्यक्रम निकाला सोबतच जाहिर करण्यांत येईल. मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवाराना कोणत्याही प्रकारच्या लेखी पत्राद्वारे कळविण्यांत येणार नाही. निकालपत्रात परिक्षा क्रमांक असलेल्या उमेदवारानी नमूद केलेल्या तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०.०० वाजता मुळ कागदपत्रासह हजर राहणे आवश्यक आहे. सदरचा निकाल जिल्हा परिषदेच्या वेब साईटवर तसेच स्थानिक वृत्तपत्रात जाहिर करण्यांत येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग